**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.०५)**

**शुक्रवार दिनांक २९ मे २०२६**

**ठळक बातम्या**

1. **यंदाच्या मान्सूनमधे सरासरीच्या ९० टक्के पावसाचा अंदाज.**
2. **जागतिक आव्हानांचा सामना करत देशाच्या अर्थव्यवस्थेनं गेल्या आर्थिक वर्षात ७ पूर्णांक ६ दशांश टक्के वृद्धीदर गाठल्याचा रिझर्व बँकेचा अहवाल.**
3. **आगामी काळात महाराष्ट्र केवळ भारतातच नव्हे तर जगात एआयचं नेतृत्व करेल- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विश्वास.**
4. **नीट-यूजी परीक्षेसाठीचा शुल्क परतावा मिळण्याकरता बँक खात्याचे तपशील सादर करण्याची अंतिम मुदत NTA नं २२ जूनपर्यंत वाढवली.**

**आता सविस्तर बातम्या .......**

नैऋत्य मोसमी

एल निनोमुळे यंदा नैऋत्य मोसमी पाऊस सरासरीपेक्षा कमी म्हणजे ९० टक्के असेल, असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. हवामान विभागाचे महासंचालक डॉ.मृत्यूंजय मोहापात्रा आणि पृथ्वी विज्ञान मंत्रालयाचे सचिव डॉ. एम. रविचंद्रन यांनी आज नवी दिल्ली इथं मान्सून २०२६ च्या दुसऱ्या टप्प्यातला दीर्घकालीन अंदाज जाहिर करताना ही माहिती दिली. एल निनोचा प्रभाव जूनपासून वाढण्याची शक्यता असून, जुलै-ऑगस्टमध्येही त्याचा परिणाम जाणवू शकतो. ईशान्य आणि पूर्व भारतात तुलनेने चांगला पाऊस अपेक्षित असला तरी मध्य आणि दक्षिण भारतात पावसाचं प्रमाण कमी राहील, असं मोहापात्रा यांनी सांगितलं.....

जून महिन्यात उत्तर प्रदेश, हरियाणा, पंजाब, बिहार, ओडिशा, छत्तीसगड आणि गुजरातच्या अनेक भागांत सरासरीपेक्षा जास्त तीव्र उष्णतेची लाट येण्याची शक्यताही त्यांनी वर्तवली. मान्सूनच्या काळात एल निनोची स्थिती निर्माण होण्याची तीव्र शक्यताही त्यांनी वर्तवली.

प्रलंबित खटले

देशभरातल्या उच्च न्यायालयांनी प्रलंबित खटल्यांवरचे आदेश, राखून ठेवल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत जाहीर करावेत, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं

आज दिले. खटल्याच्या सुनावणीत होणाऱ्या विलंबामुळे पक्षकारांचं होणारं नुकसान लक्षात घेऊन सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या खंडपीठानं हा निर्णय घेतला. वैयक्तिक स्वातंत्र्यासंबंधीच्या खटल्यांमध्ये जलदगतीनं निर्णय होण्याची आवश्यकता असल्याचंही सर्वोच्च न्यायालयानं अधोरेखित केलं.

वृद्धीदर

जागतिक आव्हानांचा सामना करत देशाच्या अर्थव्यवस्थेनं गेल्या आर्थिक वर्षात ७ पूर्णांक ६ दशांश टक्के वृद्धीदर गाठल्याचं रिझर्व बँकेच्या वार्षिक अहवालात म्हटलं आहे. २०२५-२६चा वार्षिक अहवाल भारतीय रिझर्व बँकेनं आज प्रसिद्ध केला. सर्वात वेगानं वाढणारी अर्थव्यवस्था हे स्थान भारतानं या वर्षातही कायम राखलं. जागतिक स्तरावर इंधन दरवाढ, पुरवठा साखळीतले व्यत्यय आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतल्या समस्या ही आव्हानं असली तरी भारतीय अर्थव्यवस्था मजबूत पायावर उभी असल्यानं पुढच्या काळात आर्थिक वाढीला चालना मिळेल, असं अहवालात म्हटलं आहे. २०२६-२७ मधे महागाई दर ४ टक्क्यावर रोखण्याचं उद्दिष्ट अहवालात नमूद केलं आहे. थेट लाभ हस्तांतरण योजनांचा निधी डिजिटल चलनाच्या स्वरुपात वितरित करण्याचा विचार असल्याचं या अहवालात म्हटलं आहे.

तेलवाहू जहाज

शारजाहून पेट्रोलियम घेऊन भारताकडे निघालेल्या ‘निसोस केरॉस’ या तेलवाहू जहाजाने होर्मूझची सामुद्रधुनी यशस्वीपणे पार केली असून ते ३ जून रोजी विशाखापट्टण बंदरात पोचेल. जहाजांच्या वाहतुकीचा माग घेणाऱ्या काही संस्थांच्या माहितीनुसार हे जहाज आज सकाळी भारताच्या पश्चिम किनाऱ्याजवळ पोचलं होत. इराणच्या आयआरजीसी नौदलाने गेल्या २४ तासांत २३ व्यापारी जहाजांना होर्मूझची सामुद्रधुनी पार करण्याची परवानगी दिल्याचं वृत्त इराणच्या वृत्तसंस्थेने दिल होत.

विधान परिषद

विधान परिषदेसाठीच्या १७ पैकी १५ जागांबाबत महाविकास आघाडीचा निर्णय झाला आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आज मुंबईत बातमीदारांना ही माहिती दिली. तर दोन जागांवर अद्याप चर्चा सुरू असून येत्या दोन दिवसात याबद्दल निर्णय घेऊ, असं सपकाळ म्हणाले. चंद्रपूर, यवतमाळ, भंडारागोंदिया,

धाराशिव, अहिल्यानगर, सोलापूर, अमरावती, बीड- लातूर या आठ जागांवर तर पोटनिवडणूक असणाऱ्या नागपूर इथे काँग्रेस उमेदवार देणार आहे. रायगड रत्नागिरी, जळगाव, परभणी-हिंगोली, संभाजीनग, या ठिकाणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार असतील. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार पुणे, ठाणे, सांगली-सातारा इथून उभे राहणार आहेत.

HTBT कापूस

बुलढाणा जिल्ह्यातल्या संग्रामपूर तालुक्यात अनधिकृत HTBT कापूस बियाण्यांची अवैध वाहतूक आणि विक्री करणाऱ्या टोळीला कृषी अधिकाऱ्यांच्या पथकाने रंगेहात पकडलं. या कारवाईत एकूण आठ लाख ५८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

‘आगामी काळात महाराष्ट्र केवळ भारतातच नव्हे तर जगात एआयचं नेतृत्व करेल,” असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. ते आज मुंबईत ‘मुंबई टेक विक २०२६’ च्या उद्घाटन प्रसंगी आयोजित मुलाखतीत बोलत होते. मुंबईची आर्थिक ताकद, तंत्रज्ञान कौशल्य, मजबूत स्टार्टअप परिसंस्था आणि नवतंत्रज्ञान स्वीकारण्याची तयारी यामुळे महाराष्ट्र एआय क्रांतीचं नेतृत्व करण्यासाठी अत्यंत सक्षम स्थितीत आहे, असं ते म्हणाले. मुंबई टेक वीकमध्ये सहभागी झालेल्या देश-विदेशातल्या स्टार्टअप्स आणि तंत्रज्ञान कंपन्यांना, महाराष्ट्रात गुंतवणूक करण्याचं आवाहन मुख्यमंत्र्यांनी केलं. राज्य शासन केवळ इनक्युबेशन आणि अॅक्सेलरेशनपुरतं मर्यादित नसून ‘फंड ऑफ फंड्स’च्या माध्यमातून गुंतवणूक सहाय्यही देत आहे. शासन भागीदार म्हणून तुमच्या सोबत उभं राहायला तयार आहे, अशी ग्वाही त्यांनी दिली. या कार्यक्रमाला मुंबईच्या महापौर रितू तावडे, उद्योजक, गुंतवणूकदार आणि जागतिक तंत्रज्ञान कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हा संपर्क आणि समर्थन यांच्या साह्याने लोक जागरासाठी समर्पित असून केवळ राजकीय कार्य हे त्याचे दैनंदिन उपक्रम नसून देशात एकात्मता सामाजिक समरसता नांदण्यासाठी सदैव कार्य करत राहणे हे प्रमुख

उद्दिष्ट आहे असे मत संघाचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर यांनी आज नागपूर मध्ये प्रसारमाध्यमांशी अनौपचारिक चर्चा करताना व्यक्त केलं. दरम्यान, राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे आयोजित कार्यकर्ता विकास वर्ग द्वितीय चा समापन सोहळा 4 जून रोजी होणार असून या कार्यक्रमाला प्रसिद्ध उद्योगपती पद्मभूषण कुमार मंगलम बिर्ला आणि सरसंघचालक डॉक्टर मोहन भागवत यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

नीट-यूजी शुल्क परतावा

एनटीए अर्थात राष्ट्रीय परीक्षा संस्थेनं, नीट-यूजी परीक्षेसाठीचा शुल्क परतावा मिळण्याकरता बँक खात्याचे तपशील सादर करण्याची अंतिम मुदत २२ जूनपर्यंत वाढवली आहे. आधी ही मुदत २६ मे पर्यंत होती. मात्र, नोंदणी केलेल्या २३ लाख विद्यार्थ्यांपैकी केवळ १३ लाख विद्यार्थीच त्या मुदतीत तपशील सादर करू शकले होते. पेपरफुटीमुळे रद्द केलेली ही परीक्षा २१ जून रोजी नव्यानं घेतली जाईल, त्यासाठी कोणतेही शुल्क आकारलं जाणार नाही अशी घोषणा एनटीएनं या पूर्वीच केली होती. तसंच विद्यार्थ्यांनी यापूर्वी भरलेलं परीक्षा शुल्क त्यांना परत केलं जाईल, असंही एनटीएनं स्पष्ट केलं होतं. त्या अनुषंगानं ज्या विद्यार्थ्यांनी अद्याप तपशील सादर केले नाहीत त्यांना ही प्रक्रिया पूर्ण करणं सुलभ व्हावं या उद्देशानं ही मुदतवाढ दिल्याचं एनटीएनं स्पष्ट केलं. उमेदवार त्यांचे प्रवेश-तपशील वापरून नीट यूजी २०२६ या नोंदणी पोर्टलवर लॉग-इन करू शकतात आणि बँक खात्याचे तपशील सादर करण्यासाठी 'रिफंड लिंक'चा वापर करू शकतात, असे स्षष्ट करतानाच एनटीएने बँक खात्याचे तपशील सादर करण्याची ही सुविधा २२ जूनला रात्री ११:५० वाजेपर्यंतच उपलब्ध राहील.

दूषित पाणी

गोंदिया शहरात दूषित पाणीपुरवठ्याविरोधात उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या वतीने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयात मटका फोडो आंदोलन करण्यात आले. भूमिगत गटार योजनेच्या कामामुळे अनेक ठिकाणी पाईपलाईन फुटून गढूळ पाणीपुरवठा होत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला. तसेच वाढते वीज दर आणि सुरू असलेल्या लोडशेडिंगविरोधात महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीला निवेदन देण्यात आले. या आंदोलनात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे जिल्हाध्यक्ष पंकज यादव यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. मागण्या

तातडीने पूर्ण न झाल्यास यापेक्षा तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.

आयपीएल

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत, पात्रता फेरीच्या दुसऱ्या सामन्यात, आज, गुजरात टायटन्स विरुद्ध राजस्थान रॉयल्स सामना रंगणार आहे. चंडीगढ मधे महाराजा यादविन्द्र सिंह मैदानावर संध्याकाळी सात वाजता सामन्याला सुरुवात होईल. पात्रता फेरीच्या पहिल्या सामन्यात, रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू संघाने गुजरात टायटन्स संघाचा पराभव केला होता.

हवामान

हवामान! वर्धा आणि चंद्रपूर जिल्ह्यात आजही उष्णतेच्या लाटेचा रेड अलर्ट कायम असून नागपूर, गोंदिया, गडचिरोली, अमरावती या जिल्ह्यांमध्ये उष्णतेच्या लाटेचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. दरम्यान, उद्या नागपूर सह भंडारा, गोंदिया, गडचिरोली, अकोला, बुलढाणा आणि वाशिम या जिल्ह्यांमध्ये तुरळ ठिकाणी मेघगर्जनेसह वादळी पर्जन्यमान राहण्याची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवली आहे. आज दुपारी अडीच वाजता नोंदवलेल्या तापमानानुसार सर्वाधिक कमाल तापमान ब्रह्मपुरी इथं 45 पूर्णांक 4 दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं तर नागपुरात आज 43.8 दशांश अंश सेल्सिअस इतकं कमाल तापमान नोंदवण्यात आले.

विजय वडेट्टीवार

सरकारच्या चुकीच्या धोरणांविरोधात ब्रम्हपुरीत काँग्रेसचे तीव्र आंदोलन करण्यात आले. काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांच्या नेतृत्वात काढण्यात आलेल्या मोर्चात कार्यकर्त्यांनी केंद्र सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. पेट्रोल, डिझेल आणि घरगुती गॅसच्या वाढत्या दरांमुळे सामान्य जनता, मध्यमवर्गीय आणि शेतकरी होरपळून निघाल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. केंद्रात काँग्रेसचे सरकार असताना इंधन दरवाढीविरोधात आंदोलन करणारे भाजप नेते आज सत्तेत आल्यावर महागाईकडे दुर्लक्ष करत असल्याची टीका विजय वडेट्टीवार यांनी केली. मोदी सरकारच्या चुकीच्या आर्थिक धोरणांमुळे महागाईने उच्चांक गाठला असून गरीब व मध्यमवर्गीयांचे जगणे कठीण झाले असल्याचे ते म्हणाले.

चलनीकरण

भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने २०२६-२७ या आर्थिक वर्षात चलनीकरणासाठी निवडलेल्या राष्ट्रीय महामार्गांच्या काही भागांची यादी जाहीर केली आहे. निवडलेल्या राष्ट्रीय महामार्गाची एकत्रित लांबी एक हजार ६९२ किलोमीटर असून हे रस्ते महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा, तमिळनाडू, झारखंड, बिहार, उत्तरप्रदेश, राजस्थान आणि हरियाणातून जातात. यात महाराष्ट्रातल्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ वर वर्धा ते बुटीबोरी आणि राष्ट्रीय महामार्ग ५२ छत्रपती संभाजीनगर ते कोराडी  या मार्गांचा समावेश आहे.